—: जाहिर निविदा :—

अहमदनगर मुख्यालयातील नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावर नवीन प्रशस्त सभागृहाचे मुख्य प्रवेशद्वार हे काचेचे बसविणे (अंदाजे साईज उंची ०८ फुट व रुंदी ०६ फुट) तसेच प्रवेशद्वाराचे समोरच्या मोकळया पॅसेजमध्ये आणखी एक काचेचा दरवाजा (अंदाजे साईज उंची ११ फुट व रुंदी १० फुट) करणे आवश्यक आहे. तसेच मुख्य प्रवेशद्वाराचे बाहेरील पॅसेजमध्ये न्यायदान कक्षाचे निघालेले लाकडी पार्टिशन दुरुस्त करुन बसविणे व तसेच मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश कक्षाचा मुख्य दरवाजा काचेचा (अंदाजे साईज उंची ०८ फुट व रुंदी ०६ फुट) बसविणे आवश्यक असल्यामुळे त्याबाबतची दरपत्रके अहमदनगर येथील स्थानिक बाजारपेठेतील अधिकृत विक्री करणा—यांकडून दरपत्रक मागविण्यात येत असून त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू राहतील.

त्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :—

१. आपल्या फर्मचा परवाना असणे आवश्यक आहे.

२. आपले फर्मचे नावाने पॅन व टॅन असणे आवश्यक आहे.

३. आपल्या फर्मचे नावाने जी.एस.टी. असणे आवश्यक आहे.

४ आपल्या वस्तुंचे दरपत्रक सिलबद पाकीटात देणे आवश्यक आहे.

५. सिलबद पाकीटावर दरपत्रक कशाचे आहे ते लिहिणे आवश्यक आहे.

६. सिलबंद पाकीटावर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे नाव व पत्ता लिहिणे आवश्यक आहे.

७. सिलबंद पाकीटे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधी/पोस्टाद्वारे या कार्यालयाच्या आवक टेबलकडे आणून दयावेत.

८. दरपत्रकामध्ये यादीतील सर्व वस्तुचे दर लिहिणे आवश्यक आहे, अपूर्ण दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

९. सदरहु दरपत्रक दिनाक १५/०७/२०२५ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत देणे आवश्यक आहे.

१०. तत्पर व जलद सेवा देणा—या फर्मना प्राधान्य देण्यात येईल.

११. दरपत्रकाबाबत दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये अन्यथा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर याचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

१२. कोणतेही कारण न देता दरपत्रके अस्विकार करणेचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

१३. ज्यांचे दरपत्रक वरील अटींचे व शर्तीची पूर्तता करुन कमी दराचे असेल त्यांचेच दरपत्रक स्विकारण्यात येईल.

सदरचे दरपत्रक मंगळवार दिनांक १५/०७/२०२५ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत मा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे कार्यालयात आणून देणे आवश्यक आहे.

हुकूमावरुन,

8/7/25

जिल्हा न्यायालय, अहमदनगर
दिनांक :— ०७/०७/२०२५

DISTRICT COURT AHMEDNAGAR

अधिक्षक,
लेखा व वित्त विभाग,
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

प्रत :—

१. मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर,

२. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर

३. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर

४. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

५. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई—कोर्ट साईट

D:\Shripad\DARAPATRAK YADI 2025-2026 Jahir Nivida.odt